पुण्यनगरी ५-५-४

# वर्सोवा पूल कामाच्या तपासणीचे आदेश

## पुलाला तडे, संरचना चुकीची असल्याचा खासदारांचा आरोप

**नालासोपारा** : मुंबई-गुजरातला जोडणाऱ्या भाईंदर खाडीवरील बांधकाम सुरू असलेल्या नवीन वर्सोवा पुलाच्या गर्डरला तडे गेल्याचे आढळले आहे. पुलाच्या गर्डरची रचना कमकुवत असल्याने पूल धोकादायक बनल्याचा आरोप खा. राजेंद्र गावित यांनी केला. पुलाच्या बांधकामस्थळीच अधिकाऱ्यांना पुलातील दोष दाखवले. याबाबत अधिकाऱ्यांनी आवश्यक बदल करण्याचे आश्वासन दिले आहे.



भाईंदर खाडीवर वाहनांसाठी मुंबई आणि गुजरातला जोडणारा पूल मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातर्फे तयार होत आहे. पुलाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. मात्र पुलाला काही ठिकाणी तडे गेले आहेत. पुलाची संरचना सदोष असल्याचा आरोप खा. राजेंद्र गावित यांनी केला आहे. त्यांनी थेट राष्ट्रीय महामार्ग आणि वाहतूक पोलिसांसोबत पुलाच्या ठिकाणी पाहणी केली.

गावित यांच्या खासगी वास्तुविशारदांनी पुलाच्या कामातील दोष दाखवले. पुलाचे बांधकाम झाल्यानंतर त्याला गर्डर टाकण्यात येत आहे. त्यामुळे पूल कमकुवत होणार असून तो सुरू झाल्यावर वाहनांचा भार सहन करू शकणार नाही, असे वास्तुविशारदांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. परंतु नाशिकच्या धर्तीवर पुलाचे काम सुरू असून, नंतर गर्डर बसवल्याने पूल कमकुवत होणार नसल्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला; तरीदेखील तज्ज्ञामार्फत तपासणी करून योग्य बदल केला जाईल, असे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सल्लागार सारंग चपळगावकर यांनी दिले.

> पुलाला तडे पडल्याचे आम्ही अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. पुलाच्या गर्डरची रचना चुकीची आहे. त्यामुळे पूल कमकुवत होणार आहे. त्यावर भविष्यात अपघाताचा धोका उद्भवू शकतो. पुलाचे आयुष्यमानही केवळ ५० वर्षांचे आहे. ही अत्यंत संतापजनक बाब आहे
>
> **- राजेंद्र गावित, खासदार**

> जिथे तडे पडले आहेत, त्याची दुरुस्ती केली जाईल. मात्र पुलाच्या गर्डर संरचनेत दोष नाही. तरीदेखील तज्ज्ञ अभियंत्यामार्फत पुलाची पाहणी करून आवश्यक बदल केला जाईल.
>
> **- मुकुंदा अत्तरडे, संचालक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प**

पुढारी ५-५-३.

# वसईत बेकायदा इंटरनेटचे जाळे?

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

वसई, विरारमध्ये वाढत्या इंटरनेटच्या वापरामुळे अनेक खासगी कंपन्यांनी इंटरनेटची सेवा सुरू केली आहे. ब्रॉडबँड इंटरनेट सेवेसाठी या कंपन्या वाटेल तशा पद्धतीने इंटरनेटच्या तारा टाकत आहेत. यामुळे शहरांचे विद्रुपीकरण होत आहे. तारांना कोणताही मुख्य आधार नसल्याने त्या तुटून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. वसई, विरार परिसरात करोना काळापासून घरून काम आणि ऑनलाईन शाळा सुरू झाल्याने घरा-घरात इंटरनेटची मागणी वाढली. त्यातून खासगी कंपन्यांनी ग्राहक मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू झाल्याचे दृश्य दिसत आहे.

पुढारी पा.नं. १९२.

# मुंबई ही महाराष्ट्राचीच, नाही कोणाच्या बापाची

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी कर्नाटकच्या नेत्यांना सुनावले

**नागपूर : पुढारी वृत्तसेवा**

भाषिक प्रांतरचनेच्या दुर्दैवाने काही चुकाही झाल्या, हे वास्तव आपल्याला स्वीकारावे लागेल. मात्र, मुंबई ही महाराष्ट्राचीच आहे, ती कुणाच्या बापाची नाही. त्यामुळे मुंबईवर कोणीही दावा सांगत असेल; तर ते खपवून घेतले जाणार नाही. मुंबई ही आग आहे, त्या विस्तवाशी कोणीही खेळू नये. आपल्या हक्काची ८६५ गावे आहेत. एक इंचही जमीन कर्नाटकला देणार नाही, अशा कडक शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी कर्नाटकच्या नेत्यांना सुनावले.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर मंगळवारी मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात ठराव मांडला. या ठरावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे आज कमालीचे आक्रमक झाले होते. याचवेळी त्यांनी माजी

/...२



**● मुंबई आग आहे, त्या विस्तवाशी कोणीही खेळू नये : एकनाथ शिंदे यांचाही इशारा**



**● कर्नाटकच्या नेत्यांना तंबी देण्याची तक्रार गृहमंत्र्यांकडे करणार : फडणवीस**

## मुंबई ही महाराष्ट्राचीच, नाही कोणाच्या बापाची

**पान १ वरुन :** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही जोरदार प्रत्युत्तर दिले. तेवढ्याच निकराने देवेंद्र फडणवीस यांनी कर्नाटकच्या बोलघेवड्या नेत्यांचे कान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून टोचले जातील, असा इशारा दिला.

**महाराष्ट्राच्या चुकीवरही बोट**

सीमाभाग हा महाराष्ट्राचाच अविभाज्य घटक आहे. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण आहे. आतापर्यंतचा संघर्ष आहेच; पण दुर्दैवाने काही चुकाही झाल्या आहेत. त्यावेळी झालेल्या ठरावावरून हे स्पष्ट दिसते आहे, असा ठपकाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी ठेवला.

सीमाभागातील मराठी भाषिकांसाठी योजनांची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणेच दरमहा १० हजार रुपये मिळत होते, ते आम्ही २० हजार केले. त्यानंतर लाभार्थ्यांना आपण निवृत्तीवेतनही देत आहोत. सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयाप्रमाणे १५ वर्षे जे महाराष्ट्रात राहतात, तसे तिथे १५ वर्षे वास्तव्याचा दाखला असणाऱ्यांनाही या योजना लागू आहेत. गृहनिर्माण मंडळातर्फे गाळे वाटपासाठीचा अर्ज करताना सीमाभागातील १५ वर्षे वास्तव्य हे महाराष्ट्रातील १५ वर्षे वास्तव्य असल्याचे ग्राह्य धरण्यात येईल, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक झाली होती. या बैठकीत दोन्ही राज्यांकडून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापर्यंत कोणताही नव्याने दावा केला जाणार नसल्याचे स्पष्टपणे ठरले होते; पण बैठकीत जे ठरले त्याचे पालन महाराष्ट्र करीत असला, तरी कर्नाटक मात्र ते करत नाही. ही बाब केंद्रीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली जाईल. तसेच कर्नाटकच्या बोलघेवड्या नेत्यांना तंबी दिली पाहिजे, अशी मागणीही त्यांच्याकडे करू, असे फडणवीस यांनी सभागृहात सांगितले.

**कर्नाटकला समज द्या : अजित पवार**

कर्नाटकने अशाप्रकारे जे गृहमंत्र्यांसमोर ठरले त्याचे उल्लंघन करणे हे दोन राज्यांच्या संबंधांसाठी योग्य नाही. ही भावना केवळ सरकारतर्फे नाही; तर संपूर्ण सभागृहाच्या वतीने केंद्राला कळविण्यात येईल, असे फडणवीस यांनी सांगितले. विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी कर्नाटकमधील मंत्री आणि आमदारांनी मुंबईबद्दल केलेल्या विधानांचा मुद्दा उपस्थित करून, जोरदार टीका केली. कर्नाटकला याबाबत योग्य ती समज देण्याची मागणी त्यांनी केली. त्यावर फडणवीस यांनी आक्रमक भूमिका घेत, मुंबई आमचीच आहे. कोणाच्या बापाची नाही, असे सुनावले.

### काय म्हणाले कर्नाटकचे मंत्री?

● कर्नाटकचे कायदामंत्री जे. मधुस्वामी आणि उच्च शिक्षणमंत्री अश्वत नारायण यांनी मंगळवारी मुंबईतही वीस टक्क्यांहून अधिक कन्नड भाषिक आहेत. त्यामुळे आम्हीही मुंबईवर दावा करू शकतो. मुंबई केंद्रशासित करा, असे त्यांनी म्हटले होते.

### निषेधाचे पत्र पाठविणार

● कर्नाटकचे मंत्री, आमदार अथवा काँग्रेसच्या तेथील प्रदेशाध्यक्षांनी जी वक्तव्ये केली आहेत ती पूर्णपणे चुकीची आणि बैठकीत झालेल्या निर्णयांशी विसंगत आहेत. मुंबईवर दावा सांगणे, हे खपवून घेतले जाणार नाही. त्यांच्या या वक्तव्यांचा निषेध म्हणून कर्नाटकला पत्र पाठवले जाईल, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### जतकरांना कोण भडकावते?

● जतमधल्या ४८ गावांचा पाण्याचा प्रश्न होता. त्यासाठी २ हजार कोटी देऊन त्या प्रकल्पाला मान्यता दिली. त्या भागातले लोक ठराव करतात. त्याचा सगळा रिपोर्ट आमच्याकडे आहे. कोण त्याच्या पाठीशी आहे, याची सर्व माहिती आमच्याकडे आहे, असा दावा त्यांनी केला.

पुढारी प.नं.३.

# कब्रस्तान, कत्तलखान्याच्या समर्थनार्थ जनाजा मोर्चा

## पालिकेविरोधात राष्ट्रवादी आक्रमक; मोर्चात कोंबड्या, बकऱ्या व मासळीचा समावेश



**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर शहर (जिल्हा) राष्ट्रवादी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष गुलाम नबी फारुकी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी पालिका मुख्यालयावर प्रस्तावित कब्रस्तान व कत्तलखान्याच्या समर्थनार्थ जनाजा (मुस्लिम समाजातील अंत्ययात्रा) मोर्चा काढण्यात आला. त्यात प्रशासनाच्या दिरंगाईचा निषेध करून मोर्चेकरांनी मोर्चात कोंबड्यांसह बकऱ्या व मासळीचा समावेश केला होता.

पालिकेच्या १९९७ मधील शहर विकास आराखड्यांतर्गत भाईंदर पूर्वेच्या मौजे नवघर येथील सर्वे क्रमांक २४७ वर मुस्लिम समाजाच्या दफनभूमीचे आरक्षण टाकण्यात आले आहे. या आरक्षणावर दफनभूमीचा विकास करण्याचा ठराव तत्कालीन सत्ताधारी भाजपाने बहुमताने मंजुर केला. हि आरक्षित जागा महसुल विभागाची असल्याने पालिकेच्या मागणीनुसार तसेच तत्कालीन महासभेत मंजूर झालेल्या ठरावानुसार तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ती जागा पालिकेकडे विकासाकरीता हस्तांतरीत केली. तसेच उत्तन येथील सर्वे क्रमांक ३५२ अ वरील ९९ हेक्टर जागेपैकी ५ हेक्टर या शासकीय जागेत सर्वधर्मीय स्मशानभूमी व दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी पालिकेने राज्य शासनाकडे केली. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तन येथील सर्वे क्रमांक ३५२अ वरील ५ हेक्टर जागेसह नवघर येथील सर्वे क्रमांक २४७ वरील जागेत दफनभूमीचा विकास करण्यासाठी त्याचे आरक्षण मंजूर विकास आराखड्यात समाविष्ट करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश पालिकेला दिले. तत्पूर्वी पालिकेला या दोन्ही जागांवर असलेल्या आरक्षणात फेरबदल करण्याचा ठराव प्रशासकीय बैठकीत मंजूर करावा लागणार असून तद्नंतरच मंजूर विकास आराखड्यात त्या आरक्षण समावेशाचा प्रस्ताव शासनाला मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे. असे असताना पालिकेने २८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध

### प्रस्तावित कब्रस्तान लवकरात लवकर विकसित करा

या आरक्षणावर कत्तलखाना विकसित करण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून पालिकेने जमीन संपादनासाठी जागा मालकांना नोटीसा पाठविल्या असता त्याला सर्व स्तरातून विरोध करण्यात आला. या प्रस्तावित कत्तलखान्यासह कब्रस्तानच्या समर्थनार्थ राष्ट्रवादीने अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष गुलाम नबी फारुकी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी पालिका मुख्यालयावर जनाजा मोर्चा काढला. त्यात कोंबड्या, बकऱ्या व मासळीचा समावेश करण्यात आला. यावेळी गुलाम फारुकी यांनी अपुऱ्या कब्रस्तानमुळे एका ठिकाणी दफन केलेला मृतदेह १८ महिन्यांऐवजी १० महिन्यांतच उखरून काढावा लागतो. यानंतर त्या ठिकाणी दुसरा मृतदेह दफन करावा लागतो. अनेकदा उखरून काढण्यात आलेला मृतदेह पूर्णपणे नष्ट झालेला नसतो. तसेच कोविड झालेले मृतदेह सुद्धा मुदती अगोदरच उखरून काढावा लागत असल्याने प्रस्तावित कब्रस्तान लवकरात लवकर विकसित करण्याची मागणी त्यांनी केली.

### कामे पूर्ण न केल्यास आमरण उपोषण

तसेच शहरातील सुमारे ७५ टक्के लोकं मांसाहारी आहेत. शहरातील अनेक दुकानांमध्ये मांस विकले जाते. ते मांस खाण्यालायक कितपत योग्य आहे, हे तपासता येत नाही. जर कत्तलखाना सुरु झाल्यास त्यातील जनावरांची तपासणी तेथील डॉक्टरांकडून केली जाईल. यामुळे लोकांच्या आरोग्याशी होणारा खेळ बंद होईल, असा दावा करीत त्यांनी प्रस्तावित कत्तलखाना व कब्रस्तान विकसित करण्यास प्रशासनाची दिरंगाई सुरु असल्याचा आरोप करीत त्याचा निषेध केला. हि दोन्ही प्रस्तावित विकासकामे लवकर पूर्ण न केल्यास आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. मोर्चेकरांच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे व शहर अभियंता दीपक खांबित यांची भेट घेतली असता अतिरिक्त आयुक्त व शहर अभियंत्यांनी प्रस्तावित कब्रस्तान व कत्तलखान्याचे काम लवकर सुरु करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. यानंतर मोर्चा मागे घेण्यात आला.

केलेल्या प्रारुप शहर विकास आराखड्यात भाईंदर पश्चिमकडे कत्तलखान्याचे आरक्षण टाकले. त्याला भाजपचे माजी आ. नरेंद्र मेहता यांनी विरोध केला. तसेच एमएमआरडीएच्या विशेष पर्यटन विकास आराखड्यात उत्तनच्या शिरेगावात देखील कत्तलखान्याचे आरक्षण टाकण्यात आले आहे.

सकाळ ५-५-४

# वसईत अनधिकृत बांधकामावर हातोडा

वसई, ता. २८ (बातमीदार) : वसई-विरार शहरात अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या विविध प्रभाग समिती व विशेष प्राधिकरणाने करडी नजर ठेवण्यास सुरुवात झाली आहे. यानुसार गेल्या दोन दिवसांत ७० हजार चौरस फुटांचे बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले आहे.

धानीव, पेल्हार येथे नियोजन प्राधिकरण आणि प्रभाग समिती एफ यांनी संयुक्त कारवाई करत अनधिकृत गाळे, शेड, खोल्या, हॉटेल असे ४० चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम जेसीबीच्या साह्याने पाडले. यावेळी विशेष नियोजन प्राधिकरणाचे सहाय्यक आयुक्त हर्षला सावे, सहाय्यक आयुक्त शशिकांत पाटील, कनिष्ठ अभियंता किशोर पोवार, कुणाल घरत, मिलिंद शिरसाठ, भीम रेड्डी उपस्थित होते. प्रभाग समिती नारंगी येथे गांधी चौक ते फुलपाडा पापडखिंड डॅम पर्यंतच्या परिसरातील दुकानावर कारवाई करण्यात आली. यावेळी अनधिकृत बांधकाम विभागाचे उपायुक्त अजित मुठे, प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त प्रकाश जाधव, सहाय्यक आयुक्त गणेश पाटील, कनिष्ठ अभियंता केयूर पाटील, साहिल सावे उपस्थित होते. प्रभाग समिती जी अंतर्गत अंदाजे २५ हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आले.

**वसई-विरार शहरात होणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात आहे. ही मोहीम अधिक तीव्रपणे राबवली जात असून, अनधिकृत बांधकामे करताना आढळल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल.**
**- अजित मुठे, उपायुक्त,**

लोकमत ५-५-९

# क्रिकेटवर ऑनलाइन सट्टा चालवणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** न्यूझीलंडमध्ये सुरू असलेल्या सुपरस्मॅश क्रिकेट स्पर्धेवर ऑनलाइन सट्टा चालवणाऱ्या सट्टेबाजास मीरा रोड पोलिसांनी अटक केली. नयानगरमधील अवनी मंझिल इमारतीत असलेल्या सोनू कलेक्शन या दुकानातून क्रिकेटवर सट्टा चालवला जात असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेस मिळाली. सहायक निरीक्षक नितीन बेंद्रे, राजवीरसिंग संधू, प्रवीणराज पवार, मनोहर तावरे यांच्या पथकाने मंगळवारी छापा मारला. विनोद दलवाणी (४८, रा. नर्मदा पॅरेडाइज, भारती पार्क, मीरा रोड) हा मोबाइल ॲपमधून ऑनलाइन क्रिकेट सामन्यावर सट्टा चालवताना आढळून आला. राजेश नावाच्या इसमाच्या मदतीने तो सट्टा चालवत असल्याचे तपासात आढळून आले असून पोलिसांनी त्याचा मोबाइल जप्त केला. नयानगर पोलिस ठाण्यात विनोद व राजेशविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सकाळ पा.नं.५.



नालासोपारा : तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी सिजान खान याला न्यायालयात हजर करण्यात आले.

# सिजान खानच्या पोलिस कोठडीत वाढ

## तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणाची न्यायालयात सुनावणी

नालासोपारा, ता. २८ (बातमीदार) : अभिनेत्री तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणातील आरोपी सिजान खान याच्या अडचणीत वाढ झाली आहे. त्याला ३० डिसेंबरपर्यंत दोन दिवसांची वाढीव पोलिस कोठडी मिळाली आहे. चार दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर आज बुधवारी (ता. २८) वालिव पोलिसांनी सिजान खान याला वसई न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला ३० डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

सिजान खान आणि त्याची एक अनोळखी मैत्रीण यांच्यात एक तासाच्यावर व्हॉट्सॲप चॅटिंग झाली आहे. तुनिषाची आत्महत्या झाल्यानंतर सिजानने ती चॅटिंग डिलीट केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे.

पोलिसांनी पाच दिवसांची कोठडी मागितली होती. त्यावर न्यायालयाने दोन दिवसांची कोठडी सुनावली आहे. ज्याप्रमाणे तुनीषाच्या कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला आहे; तीच परिस्थिती सिजानच्या कुटुंबाची आहे. या केसचा पूर्ण तपास व्यवस्थित व्हावा यासाठी आम्ही कोणताही विरोध केला नाही.
- शरद रॉय, सिजान खानचे वकील

पूर्ण तपास व्हावा, ही आमची मागणी आहे. आम्हाला जेव्हा बॉडी मिळाली तेव्हा ती हॉस्पिटलमध्ये होती. त्याच्या अर्धा तास अगोदर तुनीषाचा मृत्यू झाला होता. त्यामुळे तिचा मृत्यू कसा झाला, त्याचे फोटो, व्हिडीओ काहीच नाहीत. त्यामुळे याचा सर्व तपास झाला पाहिजे, अशी आमची मागणी आहे.
- पवन शर्मा, तुनिषाचे मामा

लोकसत्ता पु. पा. ४

# पोलीस भरतीमधील ९९६ जागांसाठी ७४ हजार अर्ज

## शिपाई, वाहनचालक पदांसाठी पदव्युत्तर, अभियंत्यांमध्ये स्पर्धा

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर- वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील प्रथम भरती प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. शिपाई आणि वाहनचालक पदांच्या ९९६ जागांसाठी भरती होणार असून, त्यासाठी ७४ हजार ४५८ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. या पदांसाठी केवळ बारावी पास शैक्षणिक अहर्ता असतानाही अनेक पदवीधर, पदव्युत्तर आणि अभियंत्यांनी अर्ज दाखल केल्याची माहिती समोर आली आहे.

१ ऑक्टोबर २०२० रोजी मीरा-भाईंदर- वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासुन शिपाई पदापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने काही महत्त्वाची पदे ही विविध जिल्ह्यांतून अधिकाऱ्यांच्या बदली करत भरण्यात आली होती. त्याचबरोबर महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांचीही मदत घेतली गेली. मात्र, त्यांतरही मनुष्यबळाचा अभाव असल्याने राज्य सरकारने भरती प्रक्रियेला हिरवा कंदील दाखवल्यानंतर शिपाई पदाच्या ९८६, तर शिपाई, वाहनचालक पदाच्या १० अशा एकूण ९९६ पदांसाठी नोव्हेंबरमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. यात खुल्या वर्गासाठी केवळ २७९, तर अनुसूचित जाती, जमाती, विशेष मागास वर्ग आणि इतर मागास वर्गासाठी ७१७ पदे आहेत. तसेत या भरतीत महिलांसाठी ३० टक्के, खेळाडू पाच टक्के, निवृत्त पोलिसांच्या पाल्यांसाठी, प्रकल्पग्रस्तांसाठी तीन टक्के, तर भूकंपग्रस्तांसाठी दोन टक्के, माजी सैनिकांसाठी १५ टक्के आणि गृहरक्षक (होमगार्ड) पाच टक्के तसेच अनांथांसाठी एक टक्का जागा आरक्षित आहेत.

या पदांसाठी अर्ज करण्याकरिता उमेदवारांना ३० नोव्हेंबरपर्यंतची मुदत सुरुवातीला होती. मात्र, अर्ज भरण्यात तांत्रिक अडचणी येऊ लागल्याने ती मुदत नंतर १५ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली. केवळ महिनाभरात संपूर्ण महाराष्ट्रातून ७४ हजार ४५८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

### २ जानेवारी रोजी शारीरिक चाचणी

शिपाई पदासाठी एकूण ७३ हजार २२१ अर्ज प्राप्त झाले आहेत. यात ६० हजार ९८९ तरुणांचे, तर १२ हजार २३२ तरुणींचे अर्ज आहेत. वाहनचालक पदासाठी एक हजार २३७ अर्ज आले आहेत. यात एक हजार १९६ तरुणांचे, तर ४१ तरुणींचे अर्ज आहेत. २ जानेवारी रोजी भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद बोस मैदानात ही भरती प्रक्रिया होणार आहे. यात शारीरिक चाचणी घेतली जाणार आहे. एका जागेसाठी १० उमेदवार, अशा पद्धतीने निवड प्रक्रिया करत १० हजार अथवा त्याहून अधिक प्रमाणात उमेदवार लेखी परीक्षेसाठी पाठविण्यात येणार आहेत. त्यातून प्रथम येणाऱ्या केवळ ९९६ उमेदवारांना नोकरी मिळणार आहे. यामुळे जवळपास ७० हजाराहून अधिक उमेदवार माघारी परतणार आहेत.



### 'भारतात करोना सर्दी, खोकल्यापुरताच मर्यादित'

**भाईंदर :** भारतीय नागरिकांमध्ये तीव्र प्रतिकारशक्ती निर्माण झाली असल्याने भारतात जरी करोनाची लाट आली तरी ती जीवघेणी ठरण्याची शक्यता कमी असेल. यंदाचा करोना सर्दी व खोकल्यापुरता मर्यादित असेल. म्हणूनच भारताने करोना विषाणूच्या संभाव्य लाटेला घाबरण्याची गरज नसल्याचे मत 'असोसिएशन ऑफ सर्जन ऑफ इंडिया (एएसआय)'चे निमंत्रक सचिव व 'बॉम्बे हॉस्पिटल'चे सल्लागार सर्जन डॉ. निरंजन अग्रवाल यांनी व्यक्त केले.

'एएसआय'च्या ८२ व्या चारदिवसीय परिषदेच्या निमित्ताने भाईंदर येथील एका छोटेखानी कार्यक्रमात अग्रवाल बोलत होते.

सध्याच्या करोना लाटेत नागरिक मोठ्या संख्येने पॉझिटिव्ह येत असून, सरकारकडून त्यांचे लसीकरण केले जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये रोगप्रतिकारशक्ती निर्माण होत आहे. यापूर्वीच्या लसीकरण मोहिमेमुळे त्यांच्यात तीव्र प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे. त्यामुळे आज आपण २०२० पूर्वीच्या स्थितीत पोहोचलो आहोत. ना कोणी मास्क घालत आहे, ना कोणती विशेष खबरदारी घेत आहे, असे ते म्हणाले.

या परिषदेला सात हजार डॉक्टर, मान्यवर उपस्थित होते. या वेळी शस्त्रक्रियेत होणाऱ्या आधुनिक बदलाची माहिती सर्व सहभागी झालेल्या डॉक्टरांना देण्यात आल्याची माहिती डॉ. अग्रवाल यांनी दिली.

लोकसत्ता ५.५.४.

# सेवा रस्ते अतिक्रमणांच्या विळख्यात

## मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत बेकायदा पार्किंग, खाद्यपदार्थांच्या गाड्या

**लोकसत्ता वार्ताहर**



सेवा रस्त्यांवर उभी केलेली अवजड वाहने.

**वसई :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊ लागले आहे. अवजड वाहनांचा बेकायदा तळ, विविध खाद्यपदार्थांच्या टपऱ्या, गाड्या तसेच बेकायदा गॅरेजचे वाढते बस्तान, यामुळे या रस्त्यावरून वाहतूक करणे वाहन चालकांना अवघड बनले आहे.

वसई पूर्वेतील भागातून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. हा महामार्ग दळणवळणासाठी एक महत्त्वाचा महामार्ग म्हणून ओळखला जातो. महामार्गावर ठिकठिकाणी उड्डाणपूल व सेवा रस्ते तयार केले आहेत. परंतु, तेही अपुरे आहेत. वसईच्या भागात खानिवडे, चिंचोटी, बापाणे फाटा, पेल्हार, नालासोपारा फाटा, अशा ठिकाणी महामार्गाच्या दोन्ही बाजूने सेवा रस्ते तयार केले आहेत. हे सेवा रस्ते लांब पल्ल्याचा प्रवास करणारी वाहने थांबण्यासाठी व आपत्कालीन परिस्थितीत पर्यायी मार्ग तसेच महामार्गालगतच राहणाऱ्या नागरिकांना ये-जा करण्यासाठी आहेत. परंतु, सद्यस्थितीत या सेवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढू लागले आहे. सेवा रस्त्यांवर विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांच्या टपऱ्या उभ्या राहिल्या आहेत. तर काही ठिकाणी बेकायदा गॅरेज उभी करण्यात येत आहेत. तसेच काही ठिकाणी या रस्त्यांचा वापर वाहनतळ म्हणून करण्यात येऊ लागला आहे.

चिंचोटी येथील सेवा रस्त्यावर पेट्रोलपंपाच्या समोरील भागात दिवस-रात्र मोठ्या प्रमाणावर मोठी अवजड वाहने उभी केलेली असतात. त्यामुळे सेवा रस्त्यावरून एक दुचाकीही पुढे जाऊ शकत नाही, असे येथील नागरिकांनी सांगितले. सेवा रस्ते नागरिकांच्या सेवेसाठी असून, त्यावर अतिक्रमण करून हे सेवा रस्ते गिळंकृत करण्याचा प्रकार सुरू आहे. या रस्त्यावरील अतिक्रमण हटवून ते मोकळे करावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### राडारोडा, कचऱ्याचेही ढीग



सेवा रस्त्यावर विविध ठिकाणच्या भागातील कचरा, राडारोडा छुप्या मार्गाने आणून टाकण्याचे प्रकार घडू लागले आहेत. या साऱ्या घडणाऱ्या प्रकाराकडे महामार्ग प्राधिकरणाने दुर्लक्ष केले असल्याने सेवा रस्तेही बंद होऊ लागले आहेत. त्यामुळे राडारोडा, कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

लोकमत

शॉर्टकटसाठी रॉंगसाइड ठरतेय धोकादायक

# किमान स्वतःच्या जीवाची तरी काळजी कर दादा!

**मंगेश कराळे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई तालुक्यातील पूर्व-पश्चिम विभागाला जोडणाऱ्या पुलावर जाण्यासाठी काही वाहने व दुचाकी चालक शॉर्टकटसाठी रॉंगसाईटने येऊन वेळ बचत करताना जीवघेणी ठरू शकते. महामार्गावर सुद्धा काही बेशिस्त वाहनचालक वेळ वाचवण्यासाठी शॉर्टकट घेऊन रॉंगसाईटने आल्यावर त्यांच्या जीवावर बेतल्याच्या अनेक अपघात घडले आहे. काही वेळा तर वाहतूक कोंडी असल्यावर बेशिस्त वाहनचालक विरुद्ध रस्त्यावर वाहने नेऊन रॉंगसाईटने वाहने चालवताना निर्दशनास आले आहे.

नालासोपारा पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या पुलावर जाण्यासाठी दुचाकी, रिक्षा व वाहनचालक वळसा घालून येण्याऐवजी वेळ वाचवण्यासाठी रॉंगसाईटने वाहतूक करताना दंडात्मक कारवाई केली जाते. तर ज्यावेळी वाहतूक पोलिस नसल्यावर काही वेळा अपघाताच्या घटना घडलेल्या आहे. वाहनांच्या गर्दीत वाहनचालक रॉंगसाईटला घुसून वाहतुकीचे नियम पायदळी तुडवत स्वतःचा जीव धोक्यात घालताना पाहायला मिळत आहे. रॉंगसाईडने वाहने चालवणाऱ्या विरोधात वाहतूक पोलिस नेहमी दंडात्मक कारवाई करतात. यातून मोठ्या प्रमाणात दंड वसूल करण्यात येतो.



**वसई-विरार महापालिका हद्दीतील नालासोपारा शहरात जागा मिळेल तिथून रॉंग साइडने जाणारे दुचाकीचालक अपघाताला आमंत्रण देत आहेत.**

## वसईत मागील ११ महिन्यात ४६ केसेस

जानेवारी ते नोव्हेंबर या अकरा महिन्याच्या कालावधीत विरार आणि वसई वाहतूक पोलिसांकडून विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या ४६ वाहनचालकांवर केसेस करण्यात आलेल्या आहेत. या सर्व कोर्ट केस असल्याने दंड सांगता येत नसल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले.

## पोलिसदादा जरा इकडेही लक्ष द्या

### नालासोपारा ओव्हरब्रीज

नालासोपारा शहरात पूर्व आणि पश्चिम बाजूला जोडण्यासाठी एकमेव ओव्हर ब्रिज आहे. पूर्वेकडून आणि पश्चिमेकडून येणारी वाहने जाण्यासाठी शॉर्टकट्स मारतात. संध्याकाळी वाहनांनी शॉर्टकट्स मारल्यावर वाहतूक कोंडी होते.

### मनपा मुख्यालय

वसई विरार महानगरपालिकेच्या मुख्यालयाकडे जाणारा रस्ता हा एकदिशा मार्ग करण्यात आला आहे. मुख्यालयाच्या समोरच विरार पोलिस ठाणेही आहे. तक्रार देणारे व इतर दुचाकीचालक वेळ वाचवण्यासाठी रॉंगसाईटने शॉर्टकट मारतात.

## अपघातास दिले जाते निमंत्रण



वसईतील गर्दीच्या ठिकाणी रस्त्यावर फेरीवाल्यांचे अतिक्रमण आणि त्यात खासगी वाहने रस्त्यावर उभ्या राहत असल्यामुळे वाहनचालकांना अतिशय कमी रस्ता उरतो. यामुळे अपघाताची शक्यता निर्माण होते. येथील अतिक्रमण काढण्याची गरज निर्माण झाली आहे. येथे वाहतूक पोलिस ड्युटीवर असतात, परंतु ते चलानाच्या कारवाईत व्यस्त असल्यामुळे अनेक वाहनचालक रॉंगसाईड पळ काढतात.

लोकमत

# पोलिस आयुक्तालयाला ट्विटर खात्याचा विसर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : मीरा-भाईंदर, वसई-विरार शहरांतील वाढत्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी १ ऑक्टोबर २०२० रोजी पोलिस आयुक्तालय सुरू करण्यात आले. आयुक्तालय सुरू होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटला तरी अद्याप नागरिकांच्या सोयीसाठी ट्वीटर खाते सुरू करण्यात आलेले नाही. दरम्यान, मनुष्यबळाअभावी आयुक्तालयाला ट्वीटर खाते सुरू करता आले नसल्याचे सांगण्यात येत आहे.

सध्याचा जमाना सोशल नेटवर्किंग साइट्सचा असून, त्यात फेसबुक, ट्वीटर आणि व्हॉट्सॲपचा सर्वाधिक बोलबाला आहे. त्यातही युवावर्ग आपले मत आणि विचार पटवून देण्यासाठी ट्वीटरचा सर्वाधिक वापर करतात, असे मानले जाते. महाराष्ट्रातील सर्वच पोलिस आयुक्तालयात ट्वीटर खाते आहे. पण, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाला या प्रभावी माध्यमांचा विसर पडला असून, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनाही त्यात फार रूची नसल्याचे दिसून येत आहे. पोलिस आयुक्तांशी थेट संवाद साधण्यासाठी, तक्रारी आणि सूचना करण्यासाठी तसेच मदतीसाठी अनेक शहरातील पोलिस आयुक्तालयांनी स्वत:चे ट्वीटर खाते सूरू केले होते.

Hello Vasai
Page No. 1 Dec 29, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# शिजानच्या पोलिस कोठडीत वाढ

## अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अभिनेत्री तुनीषा शर्माच्या आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेला आरोपी प्रियकर शिजान खानला चार दिवसांची पोलिस कोठडी संपल्यावर बुधवारी वालीव पोलिसांनी वसई न्यायालयात हजर केले.

पोलिसांना गुन्ह्यासंदर्भात तपास व चौकशी करण्यासाठी आणखी दोन दिवसांची पोलिस कोठडी वाढवून देण्यात आली आहे.

तुनीषाने मालिकेच्या सेटवरील मेकअप रूममध्ये गळफास घेऊन शनिवारी दुपारी आत्महत्या केली होती. या घटनेनंतर वालीव पोलिसांनी आरोपी प्रियकर शिजान खानवर गुन्हा दाखल करून अटक केली होती. त्याला न्यायालयाने पोलिस तपास आणि चौकशीसाठी चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. या गुन्ह्यात वेगवेगळ्या दिशेने तपास करण्यासाठी न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी वाढवून देण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले. तर तुनीषाच्या आर्थिक व्यवहारातही काही संशयास्पद बाबी असून त्याचा तपास पोलिसांनी करावा, तसेच पोलिसांनी वेगवेगळ्या दिशेने तपास करण्याची मागणी तुनीषाचे मामा पवन शर्मा यांनी केली आहे.

Mumbai Main
Page No. 4 Dec 29, 2022
Powered by: erelego.com

# शीजान-तुनिशा के चैट की 250 पेज की फाइल तैयार!

## शीजान की पुलिस हिरासत अवधि बढ़ाई गई


■एनबीटी ब्यूरो, मुंबई

**महाराष्ट्र के** पालघर जिले की एक अदालत ने बुधवार को एक्ट्रेस तुनिशा शर्मा की कथित आत्महत्या के मामले में गिरफ्तार एक्टर शीजान खान की पुलिस हिरासत दो दिनों के लिए बढ़ा दी। शर्मा को आत्महत्या के लिए उकसाने के आरोप में शीजान को रविवार को जिले की वलीव पुलिस ने गिरफ्तार किया था। तुनिशा शर्मा खुदकुशी मामले में एक नया खुलासा सामने आया है।

पुलिस ने शीजान व तुनिशा के बीच हुई मोबाइल चैट की ढाई सौ पेज की रिपोर्ट तैयार की है। बताया जा रहा है कि दोनों के बीच जून 2022 से अफेयर चल रहा था और नवंबर में शीजान ने तुनिशा को ब्रेकअप दिया था। इसी आधार पर पुलिस ने उसकी सेकंड रिमांड की मांग की थी। 21 साल की तुनिशा ने शनिवार को वसई के पास सीरियल के सेट पर वॉशरूम में आत्महत्या कर ली थी। उनकी मां ने आरोप लगाया है कि शीजान खान ने धोखा दिया और उनकी बेटी का इस्तेमाल किया।

> बताया जा रहा है कि दोनों के बीच जून 2022 से अफेयर चल रहा था और नवंबर में शीजान ने तुनिशा को ब्रेकअप दिया था

**दूसरी गलफ्रेंड की चैट की डिलीट :** वालीव पुलिस ने बताया कि शीजान का एक अन्य टीवी ऐक्टर से अफेयर था। शीजान उसे चैट करता था। लेकिन चैट के बाद वह सारे मैसेज डिलीट कर देता था। पुलिस शीजान के मोबाइल से डिलीट हुए मेसेज की रिकवरी करेगी। साथ ही उस लड़की को बयान के लिए पुलिस स्टेशन बुलाया जाएगा।



### तुनिशा के मोबाइल की होगी जांच

पुलिस ने घटना के दिन तुनिशा शर्मा का मोबाइल जब्त कर लिया था। उसका मोबाइल लॉक होने की वजह से पुलिस ने उसकी जांच नही की थी। अब पुलिस ने मोबाइल कंपनी को पत्र दिया है। पुलिस ने बताया कि कंपनी वाले उसका मोबाइल लॉक खोलने के बाद ही पता चलेगा कि दोनों के बीच क्या क्या बातचीत हुई थी।

### करियर-उम्र की वजह से ब्रेकअप

शीजान व तुनिशा के बीच ब्रेकअप की वजह करियर व उम्र की वजह बताई जा रही है। पुलिस ने बताया कि शीजान को अपना करियर बनाना था। तुनिशा उससे उम्र में छोटी थी।इसलिए उसने उसे ब्रेकअप दिया था। मंगलवार को तुनिशा का अंतिम संस्कार किया गया।